अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

## मराठी विभाग

## आयोजित

## "वाचन प्रेरणा दिन"

दिनांक 20/10/2021

-अहवाल-

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त मराठी विभागाच्या वतीने *दि.15 ऑक्टोबर २०२१* रोजी वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन करण्यात आलेले होते. यानिमित्ताने प्राध्यापक व विद्यार्थी भावलेल्या एका कवितेचे वाचन/रसग्रहण केलेला व्हिडिओ तयार करून दिलेल्या लिंकला अपलोड केला आणि उपक्रमामध्ये आपला सहभाग नोंदवला. या उपक्रमामध्ये तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले . एकूण काव्यवाचनाचे 15 व्हिडिओ तयार करून दिलेल्या गुगल फॉर्म वर अपलोड केले तर काही सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी मराठी विभागातील प्राध्यापकांच्या Whatsapp वर व्हिडिओ पाठविले. कार्यक्रमाचे संयोजन . डॉ सुनील खामगळ यांनी केले.

आपल्या माहितीसाठी सदर अहवाल सादर

Nemade

डॉ.रंजना नेमाडे

मराठी विभाग प्रमुख

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

मराठी विभाग

आयोजित

**वाचन प्रेरणा दिन**

जा.क्र. 161

दिनांक-14/10/2021

14 OCT 2021

- नोटीस -

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त मराठी विभागाच्या वतीने दि.15 ऑक्टोबर 2021 रोजी **वाचन प्रेरणा दिनाचे** आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने आपणास भावलेल्या कोणत्याही एका कवितेचे वाचन/रसग्रहण केलेला व्हिडिओ तयार करून खाली दिलेल्या लिंकला अपलोड करावा आणि उपक्रमामध्ये आपला सहभाग नोंदवावा. या उपक्रमामध्ये तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अधिकाधिक संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. चंद्रशेखर मुरूमकर व मराठी विभाग प्रमुख डॉ. रंजना नेमाडे यांनी केले आहे.

**सूचना- लिंक 15 ऑक्टोबर 2021 सकाळी 7:00 वा. ते 16 ऑक्टोबर 2021 रोजी सायंकाळी 7 वाजेपर्यंत ती खुली असेल.**

**खालील लिंकला क्लिक करून व्हिडिओ अपलोड करावा.**

**https://forms.gle/gih1r6sQncFCVdKY9**

**डॉ.सुनील खामगळ**
**समन्वयक**

Nemade

**डॉ..रंजना नेमाडे**
**मराठी विभाग प्रमुख**

Tuljaram Chaturchand College Baramati

**मा. प्राचार्य**

**अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे,**

**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती**

मराठी विभाग अहवाल

वाचन दिन

दि.19.6.2021 रोजी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये वाचनदिन साजरा करण्यात आला.

' सध्याच्या कोरोना महामारीमुळे तसेच अन्य कारणांनी वाचन कमी होत आहे याचाच परिणाम म्हणजे मनुष्याची प्रगल्भता कमी होत चालली आहे. वाचन माणसाला प्रगल्भ तर करतेच पण समृद्धी पण आणते यामुळे वाचन हे अत्यंत आवश्यक असून ज्ञान व समृद्धीचा तो पाया आहे' असे मनोगत प्राचार्य डाॅ.चंद्रशेखर मुरूमकर यांनी वाचनदिन कार्यक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी व्यक्त केले.

वाचनदिनानिमित्त तुळजाराम चेतुरचंद महाविधालय मराठी विभाग व ग्रंथालय विभाग यांचे संयुक्त विदयमाने आयोजीत सकाळी ८ ते सायंकाळी ८ अशा १२ तास वाचन उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

ग्रंथालय विभागातील वाचन कक्षामधे करोना नियमावलीचे पालन करत प्राध्यापक व कर्मचारी यांचे करिता वाचन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथालय विभागाने आपल्या बहुमोल ग्रंथखजिन्यातून विविध विषयांवरील पुस्तकांचे प्रदर्शन वाचकांकरीता उपलब्ध केले होते.

मराठी विभागप्रमुख प्राध्यापक. डाॅ रंजना नेमाडे यांनी आयोजक समितीतर्फे प्राचार्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. उपप्राचार्य डाॅ.अजित तेळवे, डाॅ.रामचंद्र सपकळ,डाॅ.सीमा नाईक, एन.सी.सी विभागप्रमुख ले.विवेक बळे,मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. विजय शिंदे.ज्येष्ठ प्राध्यापक डाॅ.मानाजी गावडे,मराठी विभागातील सर्व प्राध्यापक ,उपग्रंथपाल ज्ञानेश्वर लिंगे आदींसह प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. दिवसभर 96 प्राध्यापकांनी या उपक्रमात सहभागी नोंदवला.उपस्थितांचे आभार ग्रंथपाल अमर कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

आपल्या माहितीसाठी अहवाल सादर!

Nemade

डॉ. रंजना नेमाडे

मराठी विभाग प्रमुख

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे,

**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती**

**मराठी विभाग**

जा.क्र. 52 17 JUN 2021

## वाचन दिन

शासन निर्देशानुसार दिनांक 19 जून 2021 हा दिवस वाचन दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. त्यानुसार आपल्या महाविद्यालयात दिनांक 19 जून 2021 रोजी ग्रंथालयांमध्ये सकाळी 8:00 ते रात्री 8:00 या कालावधीमध्ये सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी यांनी किमान एक तास जाऊन वाचन करावे. जर आपणास एखादे विशिष्ट पुस्तक हवे असेल तर तशी मागणी मा. ग्रंथपालांकडे करावी. ग्रंथपाल ते पुस्तक आपणास उपलब्ध करून देतील.

या उपक्रमाचे उद्घाटन 19 जून 2021 रोजी सकाळी 11:30 वाजता मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांच्या हस्ते होईल. जास्तीत जास्त प्राध्यापक व कर्मचारी वर्गाने या वेळी covid-19 संदर्भातील सर्व सूचना, आदेशांचे पालन करून उपस्थित राहावे.

Nemade

डॉ. रंजना नेमाडे

मराठी विभाग प्रमुख

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

डॉ. चंद्रशेखर मुरूमकर

प्राचार्य